(४) केंद्र शासनाने सदरहू कार्यक्रमाकरिता निर्धारित केलेल्या वित्तीय आकृतीबंधानुसार लाभार्थी हिस्सा प्रति कुटुंब १ शौचालयास रु.१,०००/- आहे. लाभार्थ्यास स्व:हिस्सा रोख रक्कमेद्वारे अदा करणे शक्य नसल्यास लाभार्थी तेव्हढया रककमेचे श्रमदान करुन त्यांचा स्व:हिस्सा श्रमदानाद्वारे अदा करुन शकतील, अशी कार्यवाही नागरी संस्थांनी त्यांचे स्तरावर करावी. तथापि, लाभार्थ्याने अशा प्रकारे श्रमदानाद्वारे भरलेल्या हिश्श्याचे मुल्य रु.१,०००/- पेक्षा कमी असणार नाही यांबाबत यथायोग्य दक्षता घेऊन त्याचा हिशोब आवश्यक लेख नोंदवहीत ठेवावा आणि कोणत्याही परिस्थितीत याबाबत लेखा परिक्षा आक्षेप येणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

(५) राज्यातील सर्व नागरी संस्थांनी सदरहू कार्यक्रम नागरी स्वच्छतेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अशासकीय संस्थांच्या सहकार्याने राबवावयाचा असून प्रत्येक शहरातील आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींचा सर्व्हे करुन लाभार्थ्यांची संख्या निश्चित करणे, लाभार्थ्यांची Biometric पध्दतीची ओळखपत्रे तयार करणे, चर्चासत्रे/प्रशिक्षण यांचे आयोजन, लाभार्थी हिश्श्याची रक्कम गोळा करुन ती नागरी संस्थांकडे जमा करणे या कामांकरीता नागरी स्वच्छतेच्या क्षेत्रात कार्यरत असणा-या अशासकीय संस्थांची निवड शासनामार्फत करण्याचा निर्णय संदर्भीय शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. तथापि, या प्रक्रीयेसाठी लागणारा कालावधी, अधिक गतीने प्रकल्प प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याची आवश्यकता, बहुतांश नागरी संस्थांकडे सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी तयार असलेल्या अशासकीय संस्था तसेच, काही नागरी संस्थाचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण होऊन शासनाकडे प्राप्त होत असलेले प्रस्ताव या सर्व बाबी विचारात घेऊन उक्त कामासाठी अशासकीय संस्थांची निवड करण्याची जबाबदारी पूर्णतः राज्यातील संबंधित नागरी संस्थांकडे सोपविण्यात येत आहे. नागरी संस्थांकडून निवड करण्यात आलेल्या अशासकीय संस्थांना (NGOs) त्यांच्या कामाचा मोबदला एकूण प्रकल्प खर्चाच्या व्यतिरिक्त १५% मर्यादेपर्यंत उपलब्ध करण्यात येणाऱ्या निधी मधून देण्यात येईल. हा खर्च केंद्र व राज्य शासनामार्फत अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर ५:१ या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात येईल.

(६) संबंधित नागरी संस्थांनी NGO नी केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे केंद्र शासनाने विहीत केलेल्या वित्तिय आकृतीबंधाप्रमाणे सविस्तर प्रकल्प प्रस्ताव व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन ते राज्य शासनास दिनांक ३० नोव्हेंबर, २००८ पर्यंत निश्चितपणे सादर करण्याबाबत दक्षता घ्यावी. सविस्तर प्रकल्प प्रस्ताव [Detailed Project Report (DPR)] तयार कसा करावा, त्याचा नमुना प्रपत्र-ब वर ठेवलेला आहे.

(७) प्रकल्प प्रस्ताव केंद्र शासनाकडून मान्य होऊन केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे अनुदान प्राप्त झाल्यानंतर नागरी संस्थांनी त्यांच्या क्षेत्रातील वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम व देखभाल/दुरुस्तीचे कामाकरिता त्यांचे स्तरावर संस्थांची निवड करावी.

(८) सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या व राज्य हिश्श्याच्या अनुदानाचे संकलन व वितरण करुन त्याचे स्वतंत्र लेखे ठेवण्याकरिता आणि योजनेच्या प्रगतीचा त्रैमासिक अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित नागरी संस्थांकडून प्राप्त करुन घेण्याकरिता वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना समन्वय यंत्रणा म्हणून घोषित करण्यात येत आहे. योजनेच्या प्रगतीचा त्रैमासिक अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे नागरी संस्थांनी वेळोवेळी नियमितपणे समन्वय यंत्रणेमार्फत शासनास सादर करावीत.

२.  राज्याचा नागरी भाग हागणदारी मुक्त होण्याच्या दृष्टीने कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत राबविण्यात येणारा सदर वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम यशस्वी होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्व नागरी संस्थांनी या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकडे काटेकोरपणे लक्ष देऊन तो विहीत कालमर्यादेत पूर्ण होईल व अनावश्यक कालापव्यय होऊन प्रकल्प खर्चात वाढ होणार नाही याची यथायोग्य दक्षता घ्यावी.

३.  सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्यचा संगणक संकेतांक २००८१०२३११४२२७००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( जयलक्ष्मी चेक्कला )
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
१. मा. महापौर, महानगरपालिका (सर्व)
२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३. विभागीय आयुक्त (सर्व)
४. जिल्हाधिकारी (सर्व)
५. महालेखापाल,महाराष्ट्र-१,मुंबई [लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा]
६. महालेखापाल,महाराष्ट्र -२,नागपूर [लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा]
७. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई
९. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
१०. कार्यकारी संचालक, हूडको विभागीय कार्यालय,मुंबई
११. नगराध्यक्ष, नगर परिषदा (सर्व)
१२. मुख्याधिकारी, नगर परिषदा (सर्व)
१३. सर्व वैधानिक विकास मंडळे
१४.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने
१५. सारसंग्रह
१६.निवड नस्ती-पापु-२१

\VBAC~१\BACKUP~२\NEWLOW~१\Revd. Circular - October, २००८.doc

## ANNEXURE - A

Centrally Sponsored Integrated Low Cost Sanitation Scheme (ILCS) for Economically Weaker Section Living in Urban Areas

Name of Municipal Corporation / Council: Dist :

TABLE - I General Information of Beneficiary

| Sr. No. | Name of the Head of Household | Adress | Parshad Ward No. | Type of Structure of House | | Present Location of defication | | Present Water Supply per day / per family In liters |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Owner/ Lease Holder / Illegal | Pakka / Kachcha | Whether latrine facility available within the house/premises Yes - 1 / No - 2 | Give Code of the type of latrine facility available as per response in Coloumn 7 * | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**Specifications: (1) Has Beneficiary taken benefit under any other Scheme for individual Toilet? If yes, explain under which Scheme?**

**(2) For Column No. 8**

***Type of Latrines**

**If 'Yes' In Col. (7) , give code from the following in Col. (8)**

| | |
|---|---|
| Night's soil lifted by Scavengers. | 1 |
| Night's soil serviced by Animals. | 2 |
| Night's soil disposed to open drainage. | 3 |
| Water closed/Flush/Septic latrine. | 4 |
| Pit Latrine. | 5 |

**If 'No' IN Col. (7), then give code No. Col. (8) from the following**

| | |
|---|---|
| Public Latrine | 6 |
| Open | 7 |
| If none of the category above, give code in Column (8) | 8 |

F:\NEWLCS~1\Bio-Matric Card.doc

## ANNEXURE - A

**Centrally Sponsored Integrated Low Cost Sanitation Scheme (ILCS) for Economically Weaker Section Living in Urban Areas**

**Name of Municipal Corporation / Council:** **Dist :**

### TABLE - II - Socio Economical Information

| Sr.No. | Name of the Head of Household | No. of Persons in Family | Monthly Income of Family (Rs.) | Contribution of Beneficiary under ILCS in the form of | | Location of Toilet to be constructed under ILCS programe | Signature of Head of Household | Thumb impression of Head of Household | Photograph of Head of Household |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Cash | Voluntary Labour Contribution (Shramdan) | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

F:\NEWLCS~1\Bio-Matric Card.doc

आवक क्र. 4684
दिनांक

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : १ ऑगस्ट, २००९.**

**वाचा :-** १) शासन निर्णय क्र.ग्रापापु- १०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७, दि. २७ जुलै, २०००.
२) शासन निर्णय क्र.ग्रापापु- १००१/प्र.क्र.१९०/पापु-०७, दि.०३ सप्टेंबर, २००१.
३) शासन परिपत्रक क्र. ग्रापापु- १००२/प्र.क्र.५३२/पापु-०७, दि. २३ मार्च, २००२.
४) "राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम" (National Rural Drinking Water Programme - NRDWP) बाबतच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना.

**प्रस्तावना :**

ग्रामीण भागाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी, केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या मागणी आधारित धोरणांतर्गत विविध योजना तसेच बाह्यअर्थसहाय्यित जलस्वराज्य, आपलं पाणी प्रकल्पाच्या माध्यमातून नळ पाणी पुरवठा योजना, विंधण विहिरी, लघु पाणी पुरवठा योजना यासारख्या उपाययोजना राबविल्या जात आहेत. पाणी पुरवठ्याचे स्रोत बळकट करण्यासाठी शिवकालीन पाणी साठवण योजना तसेच महाराष्ट्र भूजल अधिनियम १९९३ अंतर्गत भूजल संवर्धनाच्या उपाययोजना केल्या जात आहेत. या माध्यमातून राज्यातील बहुतांश गावांमधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात आलेला आहे. तरीही वाढती लोकसंख्या, भूजलाची घटत असलेली पातळी यामुळे उदभवणाऱ्या अडचणी व पाण्याची वाढती मागणी यामुळे अनेक प्रश्न समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन व राबविलेल्या कार्यक्रमाचा अनुभव लक्षात घेता राज्याच्या ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये काही बदल करणे आवश्यक झाले आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मागणी आधारित लोकसहभागाचे लोकाभिमुख धोरण स्विकारले आहे. या धोरणानुसार ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची मागणी, आखणी, अंमलबजावणी व देखभाल

दुरुस्ती संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावयाची आहे. ही कार्यवाही जिल्हा परिषदा व ग्राम पंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून करण्यात येते. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. या धोरणाची अंमलबजावणी करीत असताना, आलेल्या अनुभवाच्या आधारे योजनांचे प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया, लोकसहभागातून गाव कृती आराखडे व त्याचा भाग म्हणून किफायतशीर नळ योजनेचे आराखडे तयार करणे व त्यांची अंमलबजावणी कालबध्द पध्दतीने पूर्ण करण्याची प्रक्रिया अधिक बळकट करणे आवश्यक असल्याचे दिसून आले आहे. मागणी आधारित योजनांना केंद्र व राज्य शासनाने विहित केलेल्या प्राधान्यक्रमाशी निगडीत करणे हे देखील महत्वाचे आहे.

आर्थिक वर्ष सन २००९-१० पासून केंद्र शासनाने वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे रुपांतर **"राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम" (National Rural Drinking Water Programme - NRDWP)** असे केले आहे. या कार्यक्रमांतर्गत स्त्रोत शाश्वती, पाण्याची गुणवत्ता व कुटुंब पातळीवर जल सुरक्षा यावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (व्याप्ती) NRDWP - (Coverage)

२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (पाणी गुणवत्ता) NRDWP - (Water Quality)

३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (स्त्रोत शाश्वती ) NRDWP - (Sustainability)

या कार्यक्रमांतर्गत गावाचे, जिल्हयाचे तसेच राज्याचे जल सुरक्षा आराखडे व वार्षिक कृती आराखडे तयार करणे बंधनकारक करण्यात आले आहे. भूजल व भूपृष्ठावरील पाण्याचा संयुक्त व शाश्वत वापर, भूजल संवर्धन, पाण्याची गुणवत्ता या बाबींवर या कार्यक्रमामध्ये भर राहणार आहे. पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन स्थानिक संस्थेकडे असण्यावर सुध्दा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचा भर आहे. महाराष्ट्र राज्यात पाणी पुरवठा व स्वच्छतेचे काम २००० पासूनच स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेले आहे. क्षेत्रीय सुधारणा व स्वजलधारा कार्यक्रमासोबतच शासनाने बाहय अर्थसहाय्यित जलस्वराज्य व आपलं पाणी तसेच केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी भारत निर्माण प्रकल्प याच तत्वावर राबवून लोकसहभागाची प्रक्रिया रुजविली आहे. या प्रकल्पांतर्गत लोकांचा

सक्रीय सहभाग असल्याने अशा योजनांची गुणवत्ता निश्चित चांगली असल्याचे दिसून आले आहे, म्हणून या प्रक्रियेचे ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमात सार्वत्रिकरण करणे क्रमप्राप्त झाले आहे. तसेच ग्रामीण पातळीवर योजनांची मागणी, आखणी व अंमलबजावणी करीत असताना निदर्शनास आलेल्या काही तांत्रिक व प्रशासकीय अडचणींच्या अनुभवावर काही धोरणात्मक सुधारणा करणेही गरजेचे झाले आहे.

संदर्भ क्र.४ येथील केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाची अंमलबजावणी व संनियंत्रण यासाठी राज्यस्तरावर महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या संस्थेची रचना, कार्यकक्षा व कार्यपध्दती याबाबतचा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहे. विभागीय व जिल्हा पातळीवर राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता संस्थेचे स्थानिक सहाय्य गट (local support units) स्थापन केले जाणार आहेत. यापुढे पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाचे संचलन या संस्थेमार्फत होणार असून, विभागीय व जिल्हा पातळीवरील स्थानिक सहाय्य गटांना तांत्रिक सहाय्य व त्यांची क्षमता बांधणी इ.करिता ही संस्था काम करणार आहे.

केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिकाधिक परिणामकारक व्हावी यासाठी योजना अंमलबजावणीसाठीच्या प्रचलित पध्दती व निकषांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

आर्थिक वर्ष २००९-१० पासून ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**१. धोरणातील तत्व व प्राधान्यक्रम**

ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या किफायतशीर व शाश्वत उपाययोजना घेता याव्यात व त्या संबंधित लाभार्थ्यांना परवडाव्यात, या उद्देशाने यापुढे ग्रामीण भागात नव्याने घ्यावयाच्या पिण्याच्या पाण्याच्या उपाययोजनांविषयी निर्णय घेताना खालील तत्वे व प्राधान्यक्रमाचा विचार व्हावा :-

१.१ गावात अस्तित्वात असलेल्या सर्व पिण्याच्या पाण्याच्या उपाययोजनांचा (existing drinking water infrastructure) आढावा घेऊन त्यातील स्त्रोतांचे संवर्धन व बळकटीकरण करणे, अस्तित्वात असलेल्या योजनांमध्ये सुधारणा करणे.

१.२ गुणवत्ताबाधीत गावांमध्ये सुरक्षित स्त्रोत विकसित करण्याकरिता उपाययोजना घेणे.

१.३ गावाच्या लोकसंख्येत झालेल्या वाढीमुळे पूरक योजनांचा विचार करणे.

१.४ उपाययोजना प्रस्तावित करताना, वेगवेगळया विकल्पापैकी, किमान खर्चावर आधारित विकल्पाचा विचार करणे.

१.५ एका गावातील वाडया/वस्त्यांसाठी एकच योजना करण्यापेक्षा विकेंद्रीत उपाययोजना किफायतशीर असल्यास त्याला प्राधान्य देणे. योजना आखताना सर्व भूजल व भूपृष्ठावरील सार्वजनिक व खाजगी स्त्रोतांचा अभ्यास करुन नियोजन करणे.

१.६ प्रस्तावित नळ योजनांमध्ये स्त्रोत बळकटीकरण व १००% घरगुती नळ जोडण्याचा समावेश अनिवार्य करणे.

१.७ जलस्वराज्य प्रकल्पाच्या धर्तीवर प्रस्तावित उपाययोजनेचा भाग म्हणून **गाव कृती आराखडा** तयार करणे बंधनकारक राहील. या अंतर्गत लोकसहभागातून गावातील सर्व स्त्रोतांचा सर्वकष विचार करुन पाण्याचा ताळेबंद तयार करणे.

१.८ पाण्याची गुणवत्ता टिकविण्याकरिता गावातील संपूर्ण स्वच्छता आवश्यक असून गाव हागणदारी मुक्त होणे ही अट नवीन योजनांचे काम सुरु करण्याकरिता अनिवार्य करणे.

१.९ योजना मंजूर करताना मागील तीन वर्षात टँकर्सद्वारे पाणी पुरवठा केलेल्या गावांना प्राधान्य देणे.

## २. तांत्रिक व प्रशासकीय मान्यता

२.१ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे नियोजन व आखणी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून लोकसहभागाच्या तत्वाच्या आधारे करण्यात यावी. योजनांच्या गाव कृती आराखडयास व अंदाजपत्रकास ग्रामसभेचा ठराव पारित झाल्यावर सक्षम प्राधिकरणांनी आधी तांत्रिक व नंतर प्रशासकीय मान्यता द्यावी.

२.२ रु.५०.०० लाखापर्यंत योजनांना तांत्रिक मान्यता जिल्हा परिषदेतील पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता देतील. रु.५०.०० लाखाच्या वर व रु.२.५ कोटीपर्यंत किंमतीच्या योजनांना विभागीय अधिक्षक अभियंता (NRDWP) व रु.२.५ ते ५.०० कोटीवरील योजनांना तांत्रिक मान्यता राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता संस्थेचे मुख्य अभियंता देतील. रु.५.०० कोटीच्या वरील योजनांना सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे तांत्रिक मान्यता प्रदान करतील.

२.३ रू.५.०० कोटीपर्यंत किमतीच्या योजनेस जिल्हा परिषदेच्या जल व्यवस्थापन समितीने प्रशासकीय मान्यता द्यावी. रू.५.०० कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या योजनांना शासन स्तरावर मान्यता देण्यात येईल. दरडोई खर्चाच्या निकषामध्ये न बसणाऱ्या सर्व योजना शासनाकडे निर्णयार्थ पाठविण्यात याव्यात. यासंदर्भातील दिनांक ३ सप्टेंबर, २००१ च्या शासन निर्णयातील तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेबाबतच्या तरतूदी रद्द समजण्यात याव्यात.

२.४ यापुढे पाणी पुरवठा योजनांना निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. जिल्हा परिषद व राज्य स्तरावर तांत्रिक/प्रशासकीय मान्यता मिळालेल्या योजना जिल्हा व राज्य आराखडयामध्ये समाविष्ट करण्यात येतील व जिल्हा आराखडयाला राज्यस्तरीय मान्यता समितीची मान्यता मिळाल्यानंतरच योजनांची अंमलबजावणी सुरु करता येईल.

**३. योजनांची अंमलबजावणी**

३.१ रु.५०.०० लाखपर्यंत किंमतीच्या योजनांची अंमलबजावणी ग्रामपंचायत/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या करतील व योजना पूर्ण झाल्यावर त्यांची देखभाल व दुरुस्ती करतील. रु.५०.०० लाख ते रु.५.०० कोटीपर्यंत किंमतीच्या स्वतंत्र योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदांनी करावी व पूर्ण झाल्यावर किमान तीन वर्षापर्यंत चालवून संबंधित ग्रामपंचायतीकडे वर्ग कराव्यात. मात्र, रु.५.०० कोटीपर्यंतच्या प्रादेशिक नळ योजनांच्या अंमलबजावणी, देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी जिल्हा परिषदांची राहील. जिल्हा परिषदा अशा प्रादेशिक योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचे काम ग्रामपंचायतीच्या संयुक्त समितीकडे व्यवस्थापनाकरिता हस्तांतरीत करु शकतील.

रु.५.०० कोटीहून अधिक किंमतीच्या स्वतंत्र योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत होईल व ३ वर्षापर्यंत चालवून ती योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत होईल. रु.५.०० कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या प्रादेशिक योजनांची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन

प्राधिकरणच करेल. तीन वर्षापर्यंत योजना चालविल्यानंतर अशा योजना जिल्हा परिषदांमार्फत ग्रामपंचायतींच्या संयुक्त समित्यांकडे व्यवस्थापनाकरिता देता येतील.

३.२ भूजल पुनर्भरणाच्या पारंपारिक व अपारंपारिक उपाययोजना शिवकालीन पाणी साठवण योजनांच्या तत्वानुसार व वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार यापुढेही राबविण्यात येतील व या योजनांना परिच्छेद १.१ नुसार प्राधान्य देण्यात येईल.

## ४. तांत्रिक सहाय्य व संनियंत्रण

रु.५.०० कोटीपर्यंतच्या पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी तांत्रिकदृष्ट्या योग्य प्रकारे होईल, तसेच त्यांचे संनियंत्रण चांगल्या प्रकारे होईल हे पाहण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची असेल. रु.५.०० कोटीवरील योजनांसाठी ही जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहील. ग्रामपंचायतीकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे, योजनांचे पर्यवेक्षण करणे ही कामे यापुढे तांत्रिक सेवा पुरवठादारांऐवजी जिल्हा परिषदांकडील नियमित व कंत्राटी अभियंत्यामार्फत पार पाडण्यात येतील.

नियमित अभियंत्यांना निकषाप्रमाणे काम दिल्यानंतर, गरजेनुसार किमान पाच ग्रामपंचायतींच्या नळ पाणी पुरवठा योजना किंवा रुपये २.०० कोटीपर्यंतच्या नळ पाणी पुरवठा योजनांसाठी १ कनिष्ठ अभियंता, या निकषाच्या आधारे कंत्राटी अभियंता करार तत्वावर घेता येतील. सदर कंत्राटी अभियंते जिल्हा सहाय्य कक्षाचे घटक असतील. कंत्राटी अभियंते घेण्याबाबतचे निकष व कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत सविस्तर शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहे. या शासन निर्णयाच्या दिनांकापासून तांत्रिक सेवा पुरवठादारांबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले संदर्भ क्र.३ येथील शासन परिपत्रक, दिनांक २३ मार्च, २००२ रद्द समजण्यात यावे. मात्र, प्रगतीपथावर योजनांवरील कंत्राटी अभियंत्यांची नियुक्ती होईपर्यंत तांत्रिक पुरवठादार व्यक्ती/संस्था काम चालू ठेवतील व त्यांना केलेल्या कामाच्या प्रमाणात मानधन देण्यात यावे.

## ५. योजनांची देखभाल व दुरुस्ती

योजनेचे बांधकाम दर्जेदार व्हावे याची खात्री करण्याकरिता तसेच योजना पूर्ण झाल्यानंतर हस्तांतरणाचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून जी संस्था योजनेची अंमलबजावणी करील, त्याच संस्थेने योजनेची देखभाल व दुरुस्ती करावी म्हणूनच रु.५०.०० लाखापर्यंतच्या योजनांची

देखभाल व दुरुस्ती ग्रामपंचायती/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, रू. ५०.०० लाखापेक्षा जास्त खर्चाच्या योजना पूर्ण झाल्यानंतर त्यांची देखभाल दुरुस्ती पुढील ३ वर्षापर्यंत करण्याची जबाबदारी योजनेचे बांधकाम करणाऱ्या यंत्रणेची अर्थात जिल्हा परिषद किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची राहील. त्यासाठी योजनांच्या वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्चानुसार पाणीपट्टीची आकारणी करणे व तिची वसूली थेट ग्राहकांकडून करण्याचे अधिकार संबंधित यंत्रणेस राहतील. ३ वर्षानंतर संबंधित योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत होईल. प्रादेशिक योजना मात्र जिल्हा परिषदेकडे किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडेच राहतील. अशा योजनांच्या दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे काम ग्रामपंचायतींच्या संयुक्त समितीकडे देता येईल.

**६. योजनांचे नियोजन व अंमलबजावणीची कार्यपध्दती**

६.१ आर्थिक वर्ष २००९-१० पासून राज्य शासनाचा ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम व केंद्र शासनाचा **"राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम"** यांची अंमलबजावणी राज्यात अधिकाधिक प्रभावीपणे व नियोजनबध्द पध्दतीने करता यावी, यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्तावित उपाययोजनांच्या सूक्ष्म नियोजनाअंती दरवर्षी सर्वसमावेशक कृती आराखडा तयार करण्यात यावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. हा आराखडा तयार करण्यासाठी सर्वप्रथम राज्यातील सर्व गावे/वाडयांना *सेन्सस* गावाच्या कोडशी (जनगणना सांकेतांक) निगडीत करुन त्याची Online माहिती भरावी. ही कार्यवाही झाल्यानंतर त्या त्या गावे/वाडयांची त्यावर्षीची अंदाजित लोकसंख्येची माहिती भरण्यात यावी.

६.२ गावे/वाडयांमधील निकषानुसार किती लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होते, या आधारे संबंधित गावे/वाडया पूर्णतः किंवा अंशतः हाताळलेल्या आहेत, हे ठरवावे. केंद्र शासनाच्या निकषानुसार गाव/वाडीस पाणी मिळते किंवा नाही याची निश्चिती या गावे/वाडीस उन्हाळयामध्ये किती लोकसंख्येला पाणी मिळाले या आधारे करावी. सर्व उपाययोजनांमधून उपलब्ध होणारे पाणी व भूजल आणि भूपृष्ठावरील स्त्रोतांमधून लागणाऱ्या अधिकच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन गावातील सर्व नागरिकांना घरोघरी किमान ४० लिटर दरडोई दरदिवशी प्रमाणे पाणी उपलब्ध होईल असा कृती आराखडा तयार करावा. प्रत्येक वर्षी कृती आराखडयात समाविष्ट केलेल्या गावे/वाडयांना Website वर Targeted habitation म्हणून दर्शवावे.

६.३ आराखडयातील प्रगतीपथावरील योजना व नवीन योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या वर्गीकरणानुसार अर्थात coverage, quality व sustainability प्रमाणे वर्गवारी करुन निश्चित कराव्यात. सदर कृती आराखडा कोणत्याही परिस्थितीत दरवर्षी **परिच्छेद ११** मधील वेळापत्रकाप्रमाणे तयार करण्यात यावा. कृती आराखडयात प्रगतीपथावरील, प्रशासकीय मान्यता मिळालेल्या व तत्वतः मान्य केलेल्या ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांचा समावेश करण्यात यावा. कृती आराखडयात योजनानिहाय व टप्पानिहाय आवश्यक तरतूद व अर्थसंकल्पीय शीर्षही दर्शवावे.

६.४ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी नियोजनबध्द व विहित कालावधीत व्हावी व हाती घेतलेल्या योजनांची कामे विविध अडचणींमुळे प्रलंबित राहू नयेत यासाठी राज्यात यापुढे नव्याने मंजूर करावयाच्या नळ पाणी पुरवठा योजना **नियोजन, अंमलबजावणी व बहिर्गमन** अशा टप्प्यात राबविण्यात येणार आहेत.

## ७. नियोजन टप्पा (Planning Phase)

**योजनेची मागणी**

७.१ गावे/वाडयांमध्ये पिण्याच्या पाण्याची कमतरता भासल्यास ग्रामपंचायती/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने अस्तित्वात असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या सर्व उपाययोजना व स्त्रोतांचा अभ्यास करुन उपरोक्त परिच्छेद-१ मध्ये सूचविलेल्या प्राधान्यक्रमानुसार उपाययोजना प्रस्तावित करता येतील. प्रस्तावित योजना नळ योजना किंवा विंधण विहिर/साध्या विहिरीवर आधारित किंवा एखाद्या विशिष्ट उपांगाची असू शकेल. प्रस्तावासोबत गावातील पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेबाबतची संपूर्ण माहिती या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये ग्राम पंचायतीच्या ठरावासह मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावी.

७.२ ज्या गावात प्रादेशिक योजना किंवा स्वतंत्र योजना अस्तित्वात आहे परंतु पाणीपट्टीची वसूली न झाल्यामुळे ती बंद आहे त्या गावांकरिता नवीन योजना मंजूर करण्यात येणार नाही. तसेच प्रादेशिक योजनांमध्ये असलेल्या गावात स्वतंत्र योजना मान्य केली जाणार नाही. आवश्यकतेप्रमाणे अशा योजनांमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावावर मात्र विचार करता येईल.

७.३ प्रस्तावित उपाययोजनेचा विचार करण्यापूर्वी संबंधित ग्रामपंचायतीने पुढील अटींची पूर्तता करणे अनिवार्य आहे.

अ) यापूर्वी जी नळ योजना घेण्यात आली आहे तेथे प्रत्यक्ष खर्चाच्या आधारित पाणीपट्टी आकारण्यात येते काय, ती दरवर्षी वाढविण्यात येते काय, त्यानुसार वसूली होते किंवा नाही याचा तपशील तपासावा.

ब) प्रस्ताव तयार करताना संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत गाव किमान ८० टक्के हागणदारी मुक्त झालेले असले पाहिजे. योजनेची अंमलबजावणी सुरु करण्याकरिता अनुदान मिळण्यासाठी सदर १०० टक्के हागणदारी मुक्त असले पाहिजे.

क) भूजलाच्या व्यवस्थापनाकरिता ग्रामपंचायतीने नागरिकांच्या सहभगातून पाण्याचा ताळेबंद तयार करून पाण्याच्या स्त्रोताच्या व्यवस्थापनाचा आराखडा तयार करावा.

**प्रस्तावाची तांत्रिक तपासणी**

७.४ ग्रामपंचायतीकडून मागणीपत्र आल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, सहाय्यक भूवैज्ञानिक व गट विकास अधिकारी यांचेमार्फत प्रस्तावाची तांत्रिक तपासणी च स्थळ पाहणी करावी व ढोबळ अंदाजपत्रक तयार करावे. ग्रामपंचायतीने प्रस्तावित केलेली उपाययोजना परिच्छेद १ मधील प्राधान्यक्रमानुसार उचित आहे अथवा कसे याची शहानिशा करावी. तांत्रिकदृष्ट्या सर्वात उपयुक्त आणि किमान खर्चाच्या (Least Cost Solution) विकल्पाबाबत स्थानिक लोकांशी चर्चा करुन अभिप्राय सादर करावेत. या आधारे प्रस्तावित योजनेची तांत्रिक तपासणी उपाययोजनेच्या अंदाजित किंमतीनुसार सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांनी करावी.

७.५ जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन रू.५.०० कोटीपेक्षा कमी किंमतीच्या योजनेस सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या तांत्रिक तपासणी अहवालानुसार जिल्हा परिषदेने तत्वतः मान्यता द्यावी. त्यापेक्षा अधिक किंमतीच्या योजनेची शिफारस शासनाकडे करावी. जिल्हा परिषदेच्या आर्थिक मर्यादेतील योजनेची तत्वत: मान्यता जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीला कळवावी. शासनाच्या अधिकार क्षेत्रातील योजनेच्या तत्वत: मान्यतेच्या बाबतीत अशी कार्यवाही पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग करेल. तत्वत: मान्यता दिलेल्या योजनांचा समावेश वार्षिक जिल्हा कृती आराखडयात करावा व त्याला राज्यस्तरीय समितीची मान्यता घ्यावी.

**गाव कृती आराखडा तयार करणे व योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता**

७.६ गावाच्या/वाडीच्या उपाययोजनेला तत्वत: मान्यता दिल्यानंतर व कृती आराखडयात समावेश झाल्यानंतर रू.५.०० कोटीपेक्षा कमी खर्चाच्या योजनांची संकल्पचित्रे, आराखडा व सविस्तर

अंदाजपत्रके जिल्हा परिषदेच्या तांत्रिक अधिकाऱ्यांनी तयार करावीत. स्त्रोतांच्या कामांबरोबरच त्यांच्या शाश्वततेच्या दृष्टीकोनातून भूजल पुनर्भरणाच्या कामांचे नियोजन करुन त्याचाही समावेश अंदाजपत्रकात करण्यात यावा. गावात उपलब्ध असलेल्या भूजल व भूपृष्ठावरील सर्व स्त्रोतांच्या संयुक्त वापरावर आधारित योजना प्रस्तावित करावी. नियोजन करताना उपलब्ध खाजगी स्त्रोतांचाही विचार करावा.

७.७ योजनेची आखणी नागरिकांच्या सक्रीय सहभागाने करण्यात यावी. गाव कृती आराखडा (Village Action Plan) तयार करुन त्यामध्ये योजनेचा भांडवली खर्च, योजना पूर्ण झाल्यावर ती चालविण्यासाठी आकारावयाची वस्तुनिष्ठ पाणीपट्टी स्पष्ट नमूद करावी. अशा गाव कृती आराखडयास ग्रामसभेची मान्यता घ्यावी. यामध्ये प्रस्तावित योजनेकरिता आवश्यक असलेली लोकवर्गणी व पाणीपट्टीच्या आकारणीबद्दल स्पष्ट उल्लेख असावा. ग्रामसभेचा ठराव पारित झाल्यानंतर योजनेच्या अंदाजपत्रकाला प्रथम तांत्रिक मान्यता सक्षम तांत्रिक प्राधिकाऱ्याने द्यावी. त्यानंतर, रु.५.०० कोटींपर्यंतच्या योजनेस जिल्हा परिषदेने प्रशासकीय मान्यता द्यावी. त्यापेक्षा जास्त किंमतीच्या योजना प्रशासकीय मान्यतेकरिता शासनाकडे सादर कराव्यात.

७.८ नवीन धोरणानुसार स्त्रोत, उर्ध्व नलिका व साठवण व वितरण व्यवस्थेची कामे व वेगवेगळया टप्यात कार्यान्वित करावयाची आहेत. योजनेचे काम जरी टप्पानिहाय करावयाचे झाले तरी योजनेला तांत्रिक व प्रशासकीय मान्यता सुरुवातीलाच देण्यात यावी. मात्र, कामामध्ये स्त्रोत, पंप हाऊस, पंपिंग मशिनरी, पाईप लाईन, साठवण व वितरण व्यवस्थेचे वेगवेगळे भाग दर्शवावेत. योजनेचे अंदाजपत्रक तयार करतेवेळी प्रचलित दरसूचीचा विचार करावा व कोणत्याही भाववाढीची तरतूद करु नये.

**भूसंपादन, आवश्यक परवाने व लोकवर्गणी**

७.९ या टप्प्यांतर्गत प्रस्तावित योजनेसाठी आवश्यक त्या जमिनीचे संपादन, महसूल व वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे इत्यादी विभागांची परवानगी ग्रामपंचायतीने घ्यावयाची आहे. त्याकरिता जिल्हा परिषदेने आवश्यक ती प्रशासकीय मदत ग्रामपंचायतींना करावी. नियोजन व पूर्वतयारीच्या सर्व प्रकारच्या कामासाठी लागणारा निधी ग्रामपंचायतीने त्यांच्या उत्पन्नातून व लोकवर्गणीतून उपलब्ध करावा. योजनेची एकूण लोकवर्गणी ग्रामपंचायतींने स्वतःच्या उत्पन्नातून

किंवा लोकांकडून एकत्र करून भरावी. लोकवर्गणीची रक्कम ग्रामपंचायतीने स्वत:च्या उत्पन्नातून भरल्यास सदर रक्कम संबंधित लाभार्थ्यांकडून पाणीपट्टीबरोबर ग्रामपंचायतीने वसूल करण्यास हरकत नाही. योजनेच्या नियोजनावर व पूर्वतयारीवर झालेला सर्व खर्च योजनांकरिता लागणाऱ्या १०% लोकवर्गणीचा भाग म्हणून समजला जाईल. त्याचा सविस्तर हिशोब ग्रामपंचायतीने ठेवावा.

७.१० शासनाच्या प्रचलित धोरणानुसार, ४० लिटर दरडोई दरदिवशी पाणी पुरवठयासाठी १० टक्के लोकवर्गणी लागू राहील. ५५ लिटर दरडोई दरदिवशी पाणी पुरवठयासाठी जादा होणाऱ्या १५ लिटर पाणी पुरवठ्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी १५ टक्के लोकवर्गणी भरणे अनिवार्य आहे. ५५ लिटरपेक्षा जास्त दरडोई दरदिवशी पाणी पुरवठा योजनांसाठी येणारा संपूर्ण खर्च ग्रामपंचायत/ लाभार्थ्यांनी करावा.

७.११ भूजल पुनर्भरण करुन स्त्रोत बळकटीकरणाकरीता घेण्यात येणाऱ्या रु.१०.०० लाखापर्यंतच्या खर्चाच्या उपाययोजनांसाठी लोकवर्गणीची अट लागू राहणार नाही. यासंदर्भात शिवकालीन पाणी साठवण योजनेसंबंधी आदेशातही बदल करण्यात येत आहेत.

## ८. अंमलबजावणी टप्पा (Execution Phase)

**निविदा प्रक्रिया :**

८.१ प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर व वार्षिक कृती आराखडयात प्रस्तावित योजना समाविष्ट झाल्यावर योजनेच्या खालील तीनही उपांगाबाबत एकत्रित निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

| | |
|---|---|
| उपांग - १ | स्रोतांचा विकास |
| उपांग - २ | पंप गृह, पंपीग मशिनरी, उर्ध्व वाहिनी, गुरुत्व वाहिनी व आवश्यक असल्यास जल शुद्धीकरण केंद्र |
| उपांग - ३ | साठवण टाकी व घरगती नळ जोडण्यासह वितरण व्यवस्था |

निविदा प्रक्रिया तीनही उपांगाकरिता जरी पूर्ण करण्यात आली तरी, कामाचे आदेश मात्र सुरुवातीस उपांग-१ च्या कामाकरिता देण्यात यावेत. उपांग-१ चे काम पूर्ण झाल्यानंतरच उपांग-२ चे कार्यादेश देण्यात यावेत आणि उपांग-२ चे काम पूर्ण झाल्यानंतरच उपांग-३ च्या कामाचे आदेश देण्यात यावेत. **ही बाब निविदा प्रक्रियेत व करारपत्रात स्पष्ट नमूद करावी.**

उपांग-२ व ३ चे काम उपांग-१ च्या नंतर क्रमाक्रमाने होणार असल्याने व त्या काळात दरसूचीमध्ये बदल होणे शक्य असल्याने, पुढील दरसूचीतील संभाव्य वाढ लक्षात घेऊन सर्वात कमी दराच्या निविदेच्या बाबतीत निर्णय घ्यावा.

उपरोक्त तीनही उपांगाची कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्यात यावीत. कामे पूर्ण करण्यास विलंब केल्यास, संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही करावयाचे कलम निविदेत ठेवण्यात यावे.

**स्त्रोतांचा विकास**

८.२ सर्वप्रथम योजनेच्या स्त्रोतांची (भूपृष्ठ अथवा भूजलाधारित स्त्रोतांची) कामे हाती घ्यावीत. भूजलाधारित स्त्रोतांचे काम पूर्ण झाल्यानंतर पावसाळयापूर्वी त्याची चाचणी करावी. स्त्रोतांच्या कामाबरोबरच स्त्रोतांच्या बळकटीकरणाच्या दृष्टीकोनातून भूजल पुनर्भरणाची कामे हाती घेण्यात यावीत. स्त्रोतांचे खोदकाम झाल्यावरच त्याची क्षमता चाचणी (Yield Test) करुन भूजल विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र प्राप्त करावे व नंतर त्यांचे बांधकाम पूर्ण करावे.

**पंपिंग व्यवस्था, उर्ध्व/गुरुत्व वाहिनी व जल शुद्धीकरण केंद्र**

८.३ स्त्रोतांचे काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर पंप हाऊस, पंपिंग मशिनरी, उर्ध्व वाहिनी/ गुरुत्व वाहिनी व आवश्यक असल्यास जलशुध्दीकरण केंद्राच्या कामांना सुरवात करावी. ही कामे पूर्ण झाल्यावर व विद्युत जोडणी मिळाल्यानंतर योजनेतील स्त्रोताद्वारे उपलब्ध होणारे पाणी गावातील अस्तित्वात असलेल्या साठवण टाकी/वितरण व्यवस्थेशी जोडून पाणी पुरवठा सुरु करण्यात यावा. या टप्प्यामध्येच प्रत्येक घराच्या पाणीपट्टीची आकारणी करुन वसूलीची कार्यवाही सुध्दा सुरु करावी.

**साठवण टाकी व वितरण व्यवस्था**

८.४ पंप हाऊस, पंपिंग मशिनरी, उर्ध्व वाहिनी/गुरुत्व वाहिनी, जलशुध्दीकरण केंद्र इ. कामे समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर योजनेतील साठवण टाकी व वितरण व्यवस्थेची कामे हाती घेण्यात यावीत. **वितरण व्यवस्थेअंतर्गत सर्व घरांना नळ जोडण्या देण्यात याव्यात.** हे काम पूर्ण झाल्यावर पाणी पुरवठा सुरु करुन एकंदरीत नळ योजनेची चाचणी करावी.

## ९. बहिर्गमन टप्पा (Exit Phase)

योजनेची कामे पूर्ण झाल्यानंतर नळ योजना चालविण्याकरिता पूर्व नियोजनानुसार व्यवस्था निश्चित करावी. जेथे शक्य असेल तेथे स्वयंसहायता गट, अन्यथा इतर सक्षम संस्थेमार्फत नळ योजनांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम ग्रामपंचायतीने करावे. या टप्प्यामध्ये आधीच्या सर्व टप्प्यामध्ये झालेल्या खर्चाचे वित्तीय लेखा परीक्षण, सामाजिक लेखा परीक्षण व तांत्रिक परीक्षण होऊन योजनेतील त्रुटी दूर करुन व लेखे पूर्ण करुन बहिर्गमनाची (Exit) कार्यवाही करावी.

१०. वरीलप्रमाणे जिल्हयातील योजनांचे टप्पानिहाय नियोजन केल्यानंतर जिल्हयात एका वर्षामध्येच नवीन योजनेचे सर्व टप्पे हाती घेणे शक्य होणार नाही. निधीची संभाव्य उपलब्धता विचारात घेऊन त्या आर्थिक वर्षात जेवढया योजनांची कामे हाती घेता येतील, त्यांचे नियोजन करून जिल्ह्याचा वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात यावा व त्यासाठी लागणाऱ्या निधीची मागणी करावी. सर्व जिल्ह्यांकडून प्राप्त झालेले आराखडे व निधीची मागणी व उपलब्धतेच्या आधारे राज्याचा वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात येईल व त्याला राज्यस्तरीय मान्यता समितीची मान्यता देण्यात येईल.

## ११. वेळापत्रक

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची मागणी, तांत्रिक तपासणी, तत्वत: मान्यता, सविस्तर गाव कृती आराखडे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता व जिल्हयाचे व राज्याचे कृती आराखडे तयार करण्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील. हे वेळापत्रक तयार करण्यामागील हेतू योजनांची अंमलबजावणी कालबध्द पध्दतीने व्हावी आणि योजनेस टप्पानिहाय आर्थिक तरतूद उपलब्ध व्हावी असा आहे. या दृष्टीकोनातून वेळापत्रकामध्ये संभाव्य अंमलबजावणीच्या टप्प्याचा देखील समावेश करण्यात आलेला अहे.

एका विशिष्ट वर्षाचा कृती आराखडा तयार करण्याची प्रक्रिया आधीच्या वर्षामध्येच सुरु होईल. प्रत्येक वर्षीच्या कृती आराखडयामध्ये साहजिकच प्रगतीपथावरील योजनेचा समावेश असेल. त्याबरोबरच त्याच वर्षातील तत्वत: मान्य झालेल्या योजनांचा समावेशही असेल. त्यामुळे त्याच वर्षामध्ये एकीकडे प्रगतीपथावरील योजनेची अंमलबजावणी चालू राहील व त्यावर उपलब्ध असलेला निधी खर्च करण्यात येईल, तर दुसरीकडे तत्वत: मान्य योजनांचा विस्तृत गाव कृती

आराखडा, तांत्रिक तसेच प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही पूर्ण होईल. त्याचबरोबर अंमलबजावणीचा भाग म्हणून कृती आराखडयामध्ये स्त्रोत विकसित करण्याविषयी तरतूद करण्यात येईल.

**योजनेची मागणी व त्यापुढील कार्यवाहीचे वेळापत्रक**

| टप्पा | कार्यवाही | विहीत कालावधी |
|---|---|---|
| नियोजन टप्पा | योजनेची मागणी व तांत्रिक तपासणी | एप्रिल-मे |
| | योजनेस तत्वतः मान्यता व चालू वर्षाच्या कृती आराखडयात समावेश | जूनपर्यंत |
| | गाव कृती आराखडे तयार करणे व त्यास ग्रामसभेची मान्यता | नोव्हेंबरपर्यंत |
| | तपशीलवार तांत्रिक व प्रशासकीय मान्यता | डिसेंबरपर्यंत |
| | राज्यस्तरीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादरीकरण | जानेवारीपर्यंत |
| | राज्यस्तरीय तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करणे | फेब्रुवारीपर्यंत |
| अंमलबजावणी टप्पा | योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण करणे | मार्चपर्यंत |
| | स्त्रोताचे खोदकाम पूर्ण करणे व सुरक्षित टप्प्यापर्यंत आणणे | पुढील आर्थिक वर्षाच्या जून-जुलैपर्यंत |
| | स्त्रोताचे काम पूर्ण करणे | पुढील आर्थिक वर्षाच्या नोव्हेंबरपर्यंत |
| | उपांग-२ | पुढील आर्थिक वर्षाच्या मार्चपर्यंत |
| | उपांग-३ | त्यापुढील आर्थिक वर्षात एप्रिल ते डिसेंबर |
| बहिर्गमन टप्पा | | त्यापुढील आर्थिक वर्षात जानेवारी ते मार्चपर्यंत |

एका विशिष्ट वर्षाच्या कृती आराखडयामध्ये समाविष्ट मान्य योजना, पुढील वर्षाच्या कृती आराखडयामध्ये आपोआप प्रगतीपथावरील योजना म्हणून समाविष्ट होतील व ही नियोजन प्रक्रिया निरंतर चालू राहील. वरील वेळापत्रकावरुन दिसून येईल की, योजनेच्या मागणीपासून बहिर्गमनापर्यंत सर्वसाधारणपणे तीन वर्षाचा कमाल कालावधी लागतो. असे असले तरी योजना यापेक्षा कमी कालावधीत पूर्ण करणे शक्य आहे.

१२. वरील मार्गदर्शक सूचना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील. मात्र, ज्या ठिकाणी योजनांची कामे यापूर्वीच सुरु केली असून प्रगतीपथावर आहेत अशा योजना यापूर्वी निर्गमित केलेल्या धोरणाच्या आधारे पूर्ण केल्या जातील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८०४१७३८०८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित कुमार जैन)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय,
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

च-१३३१ -८

प्रपत्र

गाव /वाडी / वस्ती / तांडा यामध्ये नव्याने नळ पाणी पुरवठा योजना घ्यावयाची असल्यास सादर करावयाची तपशीलवार माहिती

सर्वसाधारण माहिती :

| | | |
|---|---|---|
| १ | गाव /वाडी / वस्ती / तांडा याचे नाव | |
| २ | गावाचे नाव | |
| ३ | ग्रामपंचायतीचे नाव | |
| ४ | जिल्हा | |
| ५ | तालुका | |
| ६ | सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | |
| ७ | सध्याची लोकसंख्या (वर्ष / लोकसंख्या) | |
| ८ | प्रकल्पित लोकसंख्या (वर्ष / लोकसंख्या) | |
| ९ | गाव /वाडी / वस्ती / तांडा टँकरग्रस्त आहे काय, | |

असल्यास संबंधित गावात गेल्या पाच टँकरद्वारे केलेल्या पाणी पुरवठ्याचा तपशील

| अनु.क्र. | वर्ष | टँकरचा कालावधी | टँकरची संख्या | तपशीलवार कारणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |

गाव /वाडी / वस्ती / तांडा यामधील पिण्याच्या पाण्याच्या एकूण स्रोतांची माहिती

| अनु.क्र. | स्रोताचा प्रकार | ठिकाण | पाण्याची उपलब्धता हंगामी / वर्षभर | हंगामी असल्यास किती कालावधीसाठी | पाण्याची गुणवत्ता | वापर / |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

उपलब्ध पिण्याच्या पाणी पुरवठा साधनांचा तपशील

| अनु.क्र. | साधनांचा प्रकार | संख्या | पाण्याची उपलब्धता | |
|---|---|---|---|---|
| | | | पिण्यासाठी | अन्य उपयोगासाठी |
| १ | साध्या /खणलेल्या विहिरी | | | |
| २ | हातपंप असलेल्या विंधण विहिरी | | | |
| ३ | वीजपंप असलेल्या विंधण विहिरी | | | |
| ४ | लघु पाणी पुरवठा योजना | | | |
| ५ | ड्युएल पंप पाणी पुरवठा योजना | | | |
| ६ | नळ पाणी पुरवठा योजना | | | |
| ७ | प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना | | | |
| ८ | तलाव | | | |
| ९ | साठवण तलाव / धरण | | | |
| १० | नदी | | | |
| ११ | नाला | | | |
| १२ | पाझर तलाव | | | |
| १३ | झरा | | | |
| १४ | मजीप्रा /मऔविमं / सिडको यांची परिसरातून जाणारी जलवाहिनी | | | |
| १५ | धरण / कालवा याखालील पाझर विहिर | | | |
| १६ | साठवण तलाव | | | |
| १७ | पाउस पाणी संकलन योजना | | | |
| १८ | अन्य काही असल्यास | | | |

पाणी टंचाईच्या कालावधीत वापरण्यात येणारे स्रोत ( सार्वजनिक / खाजगी )

| अनु.क्र. | स्रोताचा प्रकार | ठिकाण | सार्वजनिक / खाजगी | पाण्याची गुणवत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

एच-१३३१[ १२००-८-२००९]-९

| | |
|---|---|
| | **गाव / वाडी / वस्ती / तांडा येथे अस्तित्वात असलेल्या नळ योजनेची तपशीलवार माहिती** **( एकापेक्षा जास्त योजना असल्यास स्वतंत्र शीटवर माहिती द्यावी)** |
| A | योजना कार्यान्वित झाल्याचे वर्ष |
| B | प्रकल्पीत वर्ष |
| C | प्रकल्पीत लोकसंख्या |
| D | पाणी पुरवठा योजनेवर झालेला खर्चाची उपांग निहाय माहिती |
| | स्रोत - , जलवाहिनी - , पंपींग मशिनरी - , इ.- |
| | जीएसआर- , इएसआर - , वितरण व्यवस्था - , घरगुती कनेक्शन्स - , इ. - |
| H | किती दरडोई दर दिवशी पाणी पुरवठा विचारात घेऊन नळ योजनेची आखणी करण्यात आली आहे. |
| I | घरगुती कनेक्शन्सची संख्या |
| J | सार्वजनिक नळ कोंडाळ्यांची संख्या |
| K | गावाच्या एकूण लोकसंख्येपैकी किती लोकसंख्येसाठी योजना प्रस्तावित करण्यात आली होती. |
| L | १ किमी.च्या परिसरात वॉटरशेड डेव्हलपमेंट क्षेत्राखाली घेण्यात आलेल्या उपाययोजना |
| | दि.२८ फेब्रुवारी,२००८ च्या शासन निर्णयान्वये विहित केल्यानुसार गावाने टंचाई प्रतिबंधक उपाययोजना अमलात आणलेल्या आहेत काय, असल्यास त्यांची माहिती |
| M | गावातील सर्व हातपंपांना १२ जीआय पाइप्स व कनेक्टींग रॉड्स आहेत काय |

**अत्यावश्यक माहिती**

| | |
|---|---|
| A | गाव / वाडी / तांडा / वस्ती यामधील किती लोकसंख्येला पिण्याच्या पाणी पुरवठा योजनेचा फायदा होत नाही |
| B | नसल्यास का |
| C | पाऊस पाणी संकलनाच्या उपाययोजना केलेल्या आहेत काय |
| D | पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचा एकत्रित वापर केला आहे काय |
| E | शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत उपाययोजना घेण्यात आली आहे काय |

**अस्तित्वातील नळ पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्तीची मागीलआर्थिक वर्षावर आधारित माहिती**

**मासिक / वार्षिक खर्च**

| | | |
|---|---|---|
| A | वीज देयक | |
| B | पाणी शुद्धीकरणासाठी येणारा खर्च | |
| C | वेतन | |
| D | किरकोळ दुरुस्ती | |
| E | अन्य काही असल्यास | |
| | एकूण | |

**पाणीपट्टीची मासिक / वार्षिक वसूलीचा तपशील**

| | | मासिक | वार्षिक |
|---|---|---|---|
| A | घरगुती कनेक्शन्सची संख्या | | |
| B | घरगुती कनेक्शन्सचा त्याच्या प्रकारानुसार वार्षिक दर | | |
| C | पाणी पट्टीची वसूली रु. व टक्केवारीमध्ये | | |
| D | सार्वजनिक नळकोंडाळ्यांची संख्या | | |
| E | सार्वजनिक नळकोंडाळ्यांचा वार्षिक दर | | |
| F | पाणी पट्टीची वसूली रु. व टक्केवारीमध्ये | | |

**पाणीपट्टीमध्ये वाढ करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना**

| | | |
|---|---|---|
| A | गावात हात पंप असल्यास त्याच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडे करार करण्यात आलेला आहे काय | होय / नाही |
| B | गावात वीजपंप असल्यास त्याच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडे करार करण्यात आलेला आहे काय | होय /नाही |

**मागील तीन वर्षात प्राप्त झालेल्या देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाचा तपशील**

**या निधीचा विनियोग कसा करण्यात आला**

| | | | |
|---|---|---|---|
| A | खर्च केलेला निधी | | |
| B | शिल्लक निधी | | |

**अन्य योजनेखाली (टंचाई निवारण कार्यक्रम, बारावा वित्त आयोग, जिप सेस इ.खाली) निधी उपलब्ध झालेला असल्यास त्याचा तपशील**

| अनु.क्र. | आर्थिक वर्ष | रक्कम | विनियोगाचा तपशील |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

एच-१३३१ -९अ

**बाराव्या वित्त आयोगाच्या प्राप्त झालेल्या निधीपैकी किती निधी पाणी पुरवठा उपाययोजनांवर खर्च करण्यात आला त्याचा तपशील**

**पाणी गुणवत्ता विषयक मानके**

| | | |
|---|---|---|
| A | टीसीएल पावडर उपलब्ध होते का | |
| B | फिल्ड टेस्ट किट पुरविण्यात आली आहेत का | |
| C | त्यांचा वापर होता काय | |
| D | याबाबतचा तपशील ठेवण्यात आला आहे काय | |
| E | अहवाल जिल्ह्याला पाठविण्यात येतो काय | |
| F | जर अहवाल पॉझिटीव्ह असेल तर त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात आलेली आहे काय | |
| G | गावातील पिण्याच्या पाण्याच्या सर्व स्रोतांचे मानके तपासण्यात आली आहेत काय | |
| H | गावाला शुद्ध व स्वच्छ तसेच सातत्याने पाणी पुरवठा होतो काय | |

**प्रस्तावित नवीन योजनेबाबतची माहिती (सुस्पष्ट व तपशीलवार माहिती द्यावी)**

A अस्तित्वात असलेली योजना पुरेशी का ठरत नाही

B नवीन प्रस्तावित योजनेचा तपशील

C नवीन योजना प्रस्तावित करण्याची सबळ कारणे

D प्रस्तावित उपाययोजना ही कमी खर्चाची उपाययोजना आहे काय

E प्रस्तावित उपाययोजनेचा दरडोई खर्च विहित निकषात आहे काय

F प्रस्तावित योजनेमध्ये १०० टक्के घरघुती कनेक्शन्स विचारात घेतली आहेत काय

G योजनेचा वार्षिक एकूण देखभाल दुरुस्ती खर्च विचारात घेऊन पाणी पट्टी निर्धारित करण्यात आली आहे काय

H पाणीपट्टी वसूलीत सातत्याने सुधारणा करण्यात येते काय

J गाव निर्मल ग्राम झालेला आहे काय

K गावातील सर्व वाड्या / वस्त्यांचा विचार योजना प्रस्तावित करताना विचार केला आहे काय

**प्रस्तावित स्रोताबाबतची माहिती**

स्रोताचा प्रकार

स्रोत पुरेसा ठरे काय

स्रोताला उन्हाळ्यात देखील पाणी उपलब्ध होईल याबाबतची खातरजमा कशी करण्यात आली आहे

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम**
देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी ग्राम पंचायती, जिल्हा परिषदा व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चालविण्यात येणा-या स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक देप्रोअ-१३०९/प्र.क्र.६९/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक १७ ऑगस्ट २००९**

वाचा :- (१) शासन आदेश, ग्राम विकास विभाग क्र.ग्रापापु १०८५/सीआर ७८०३/३९, दिनांक १७ नोव्हेंबर, १९८६
(२) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्रमांक ग्रापापु १०९८/प्र.क्र.२११/पापु-०७ दिनांक १४ डिसेंबर, १९९८
(३) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्रमांक ग्रापापु १०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७ दिनांक २७ जुलै, २०००
(४) शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.व्हीपीएम. २०००/ प्र.क्र.१३६३/२२, दिनांक १७ जानेवारी, २००२
(५) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्रमांक ग्रापापु १००२/प्र.क्र.६३९/पापु-०७ दिनांक २२ मे, २००३
(६) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्रमांक ग्रापापु १००३/प्र.क्र.२५६/पापु-०७ दिनांक १० जुलै, २००६
(७) शासन निर्णय, क्रमांक ग्रापापु १००७/प्र.क्र.२३३/पापु-०७, दिनांक २० मे, २००८
(८) शासन परिपत्रक क्रमांक देप्रोअ-१३०८/प्र.क्र.८९/पापु-०७, दिनांक ३० जुलै, २००८

प्रस्तावना :

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासनाने संदर्भ क्र. १ येथील दि. १७ नोव्हेंबर, १९८६ च्या आदेशान्वये जिल्हा परिषद स्तरावर **जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीची** स्थापना केलेली आहे. या देखभाल दुरुस्ती निधीमध्ये जिल्हा परिषदेने तिच्या विशिष्ट वार्षिक उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम दरवर्षी जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबरोबरच जिल्हा परिषदेकडून चालविण्यात येणाऱ्या प्रादेशिक योजनांच्या पाणीपट्टी वसूलीच्या रकमा देखील या निधीत जमा करणे आवश्यक आहे. या जमा रकमांमधून जिल्हा परिषदेने प्रादेशिक योजनांच्या देखभाल दुरुस्ती व महत्वाच्या दुरुस्त्यांची कामे पूर्ण करणे अपेक्षित आहे.

२. संदर्भ क्र.२ येथील दि. १४ डिसेंबर, १९९८ च्या शासन निर्णयान्वये ग्रामपंचायत स्तरावर ग्राम पाणी पुरवठा निधीची स्थापना करण्यात आलेली आहे. या निधीमध्ये जमा करावयाच्या रकमा व त्यातून करावयाचा खर्च या बाबत सुस्पष्ट सूचना या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.

३. संदर्भ क्र. ३ येथील दि. २७ जुलै, २००० च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, मागणी आधारित पुरवठा आणि समूहसहभागाच्या तत्त्वावर राबविण्यात येत आहे. या धोरणानुसार योजनेची **निवड, आखणी व अंमलबजावणी** ही संबंधित गावच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करावयाची आहे. तर, योजनेच्या देखभाल व दुरुस्तीवरील १०० टक्के खर्च संबंधित लाभार्थ्यांनी करावयाचा आहे. शासन यंत्रणेचा यामधील सहभाग हा **सहाय्यकर्त्याचा** राहणार आहे. शासनाची सहाय्यकर्त्यांची भूमिका जिल्हा परिषदेमार्फत राबवावी असे धोरण ठरविण्यात आले आहे.

४. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची १०० टक्के देखभाल दुरुस्ती ग्रामस्थांनीच स्वखर्चाने करावी व त्यासाठी त्यांनी पाणीपट्टीव्दारे निधी उपलब्ध करुन घ्यावा यासाठी संदर्भ क्र ४ येथील शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, दिनांक १७ जानेवारी, २००२ अन्वये **पाणीपट्टी वरील कमाल मर्यादा काढून टाकण्यात आली आहे.** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्चाचा अंदाज घेऊन त्याअनुषंगाने पाणी पट्टीची आकारणी करणे, आकारलेल्या पाणीपट्टीची जास्तीतजास्त वसूली होईल यासाठी प्रयत्न करणे ही संबंधित जिल्हा परिषद / ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. जेणेकरून योजना स्वयंसंतुलित होतील.

५. संदर्भ क्र. ५ येथील दि. २२ मे, २००३ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र गावच्या तसेच प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी सुटसुटीत व पारदर्शक पद्धती विहित करण्यात आली आहे.

६. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी केंद्र शासन पुरस्कृत वर्धीत वेग कार्यक्रमाखाली उपलब्ध होणाऱ्या अनुदानाच्या १५ टक्के व राज्यस्तरावरून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीतून १५ टक्के निधी राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध करून देण्यात येतो. यामध्ये केंद्र शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीचा हिस्सा मोठा आहे. भविष्यात केंद्र शासनाच्या केंद्र पुरस्कृत वर्धितवेग कार्यक्रमाच्या धोरणात काही बदल झाल्यास देखभाल दुरुस्ती अनुदानावर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो. ही बाब विचारात घेता ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे शासनावरील अवलंबित्व कमी करून त्या जास्तीतजास्त स्वयंसंतुलित करणे गरजेचे झाले आहे.

७. मागणी आधारित समूहसहभागाच्या धोरणाची अंमलबजावणी करताना ज्या योजनांना नैसर्गिक परिस्थितीमुळे दुरुन पाणी आणावे लागते अशा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान मिळण्यासाठी

संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार पाणी पट्टीची योग्य आकारणी व प्रभावी वसुली करण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या जिल्हा परिषदांना / ग्राम पंचायतींना प्रोत्साहित करण्यासाठी या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या स्वतंत्र व प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान सुरु केलेले आहे.

८. संदर्भ क्र. ७ येथील शासन निर्णयानुसार पाणीपट्टीची योग्य आकारणी करणाऱ्या व त्या अनुषंगाने वसुली करणाऱ्या सर्व गावे / वाड्यांना या अनुदानासाठी पात्र ठरता यावे, तसेच सर्व जिल्ह्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात, त्या त्या जिल्ह्यातील डोंगराळ क्षेत्राच्या प्रमाणात योग्य हिस्सा मिळावा, पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी हातपंपावर व विद्युतपंपावर अवलंबून असलेल्या गावे / वाड्यांना देखील या अनुदानाचा लाभ व्हावा या अनुषंगाने या अनुदानासाठीच्या पात्रतेच्या प्रचलित निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

९. संदर्भ क्र.७ येथील शासन निर्णयान्वये लोकसंख्या व पाणीपट्टीची वसूली हे निकष लावल्याने हातपंपावर / वीजपंपावर अवलंबून असलेल्या गावे / वाडयासह सर्व गावे/ वाडयांना न्याय मिळालेला असला तरीही वीज दर वाढीमुळे राज्यातील अनेक योजना बंद पडण्याचे प्रमाण वाढलेले आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाच्या निकषात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद बाबींचा विचार करून संदर्भ क्र. ७ येथील दि.२० मे, २००८ चा शासन निर्णय अधिक्रमीत करुन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाच्या वितरणाचे निकष पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

१. आर्थिक वर्ष २००९-१० पासून राज्यस्तरावर देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध असलेल्या एकुण देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानापैकी हातपंप / वीजपंपांच्या देखभाल दुरुस्तीसाठी १५ टक्के निधी, राज्यातील नियमित (Regular) चालणाऱ्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी १५ टक्के निधी, राज्यातील हंगामी (Seasonal) चालणाऱ्या ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी १५ टक्के निधी आणि राज्यातील गुरुत्व आधारित योजनांसाठी ५ टक्के निधी राज्यस्तरावर राखून ठेवला जाईल. उर्वरित ५० टक्के निधी सर्व जिल्हा परिषदांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात एका गावाच्या स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी वितरीत करण्यात येईल.

३. राज्यस्तरावर देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध असलेल्या एकुण देखभाल दुरुस्ती प्रा अनुदानाच्या १५ टक्के निधी पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी वापरण्यात येणा-या हातपंप व वीजपंपांच्या देखभाल दुरुस्तीसाठी राखून ठेवण्यात येईल. सर्व गावांमधील हातपंप व वीजपंप यांच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी ग्राम पंचायतींनी जिल्हा परिषदेसोबत करार करणे बंधनकारक राहिल व दर हातपंप व वीजपंप करिता अनुक्रमे रु.१०००/- व रु.५०००/- एवढी रक्कम दरवर्षी ग्रामपंचायतींनी जिल्हा परिषदेकडे भरावी. ही रक्कम भरली नसल्यास जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतींना देय असणाऱ्या शासकीय अनुदानातून थेट कपात (At source) करावी. अशा प्रकारे कपात करून प्राप्त झालेला निधी जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये जमा करावा.

४. जिल्हा हातपंप देखभाल दुरुस्ती पथकाने ऑक्टोबर ते जानेवारी या चार महिन्यात जिल्ह्यातील सर्व हातपंप व वीजपंपांची पाहणी करून नियमित व आवश्यकतेनुसार देखभाल दुरुस्ती करावी.

५. राज्यातील नियमित चालणाऱ्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठीचा १५ टक्के निधी वितरीत करण्याचे निकष पुढीलप्रमाणे असतील:

- वर्षभर चालू असणा-या योजना नियमित प्रकारात मोडतील.
- नियमित चालू असणाऱ्या योजनांची विद्युत देयके महावितरण कंपनीस अदा करण्यात आल्यानंतर देयकांच्या रकमेची ५० टक्के प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येईल. यासाठी प्रदान केलेल्या वीज देयकांच्या छायाप्रती सादर करणे आवश्यक आहे.
- या योजना या कालावधीत पूर्णपणे चालू होत्या व त्याद्वारे या कालावधीसाठी नियमित पाणी पुरवठा करण्यात आला आहे, हे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित करावे.

६. राज्यातील हंगामी चालणाऱ्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठीचा १५ टक्के निधी वितरीत करण्याचे निकष पुढीलप्रमाणे असतील :

- ज्या योजना वर्षाच्या केवळ काही कालावधीसाठी चालू असतात किंवा टंचाई कालावधीत चालू असतात / ठेवाव्या लागतात अशा योजना हंगामी प्रकारात मोडतील.
- हंगामी प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांना फेब्रुवारी ते जून या कालावधीतील महावितरण कंपनीस अदा करण्यात आलेल्या वीज देयकांची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येईल. यासाठी प्रदान केलेल्या वीज देयकांच्या छायाप्रती सादर करणे आवश्यक आहे.
- या योजना या कालावधीत पूर्णपणे चालू होत्या व त्याद्वारे या कालावधीसाठी नियमित पाणी पुरवठा करण्यात आला आहे, हे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित करावे.

७. राज्यातील गुरुत्व आधारित ग्रामीण प्रादेशिक व स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठीचा ५ टक्के निधी वितरीत करण्याचे निकष पुढीलप्रमाणे असतील :

- अशा योजनांच्या बाबतीत त्यांच्या मागील आर्थिक वर्षातील एकूण देखभाल दुरुस्तीच्या खर्चाच्या ५० टक्के रकमेची प्रतिपूर्ती उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेपर्यंत शासनाकडून करण्यात येईल.
- या योजना या कालावधीत पूर्णपणे चालू होत्या व त्याद्वारे या कालावधीसाठी नियमित पाणी पुरवठा करण्यात आला आहे, हे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित करावे.

८. परिच्छेद ३ ते ६ नुसार देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानासाठीचे प्रस्ताव जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास दरवर्षी ३१ ऑगस्ट पर्यंत सादर करावेत. प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाचे वाटप संबंधितांना राज्यस्तरावरून करण्यात येईल.

९. उर्वरित रकमेचा ४५ टक्के देखभाल दुरुस्ती निधी सर्व जिल्हा परिषदांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वितरीत करण्यात येईल. हा निधी जिल्हा स्तरावरून जिल्ह्यातील एका गावच्या स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांसाठी (Single village schemes) अनुज्ञेय ठरेल.

१०. या ग्रामपंचायतींना मागील आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष प्रदान केलेल्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) वार्षिक देयकांच्या ५० टक्के निधी देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान म्हणून अनुज्ञेय ठरेल. अशा रितीने निधी उपलब्ध करून देताना राज्यस्तरावरील निधी कमी पडत असेल तर येणाऱ्या फरकाइतका निधी जिल्हा परिषदेने जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीतून उपलब्ध करून द्यावा. अन्यथा उपलब्ध निधीच्या प्रमाणात अनुदानाची अदायगी करावी.

११. उर्वरित ५ टक्के निधी प्रत्येक जिल्ह्यातील ३ ग्रामपंचायतीना पाणी पुरवठा योजनांची आदर्श संगलनजालणी, देखभाल दुरुस्ती, पाणीपट्टीची वस्तुनिष्ठ आकारणी व १०० टक्के वसूली, १०० टक्के घरगुती कनेक्शन व भूजल पुनर्भरण इत्यादीसाठी त्यांनी मागील आर्थिक वर्षात केलेल्या कामासाठी बक्षिस रूपाने देण्यात येईल.

१२. देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या देयकांची प्रतिपूर्तीसाठी मागणी न आल्याने जिल्हास्तरावर शिल्लक राहिलेला निधी योजना नुतनीकरण निधीत जमा करण्यात यावा, तर राज्य स्तरावर शिल्लक राहिलेला निधी जिल्ह्यांच्या लोकसंख्येनुसार जिल्ह्यांना योजना नुतनीकरण निधीमध्ये जमा करण्यासाठी अदा करण्यात येईल.

१३. कार्यवाहीच्या सुलभतेसाठी देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाच्या वितरणाचे सुस्पष्ट विवरण सोबत जोडले आहे.

१४. योजना नुतनीकरण निधीबाबत संदर्भ क्र. ८ येथील शासन निर्णयान्वये विहित केलेल्या इतर अटी व शर्ती कायम असतील.

१५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०७२९१८१८०८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(अजितकुमार जैन)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, (सर्व)
मा. मुख्य सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
जिल्हाधिकारी (सर्व)
प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
प्रकल्प अधिकारी, आपले पाणी प्रकल्प, सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)
तहसीलदार (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
कार्यक्रम समन्वयक, भारत निर्माण कक्ष, नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई
संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

[illegible] देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाचे वितरण [illegible] करण्यात येत आहे.

[illegible] राज्य स्तरावर देखभाल दुरुस्तीसाठी रु.१००.०० कोटी निधी उपलब्ध आहे.

**रु. १५ कोटी**
स्वतंत्र ग्रामपंचायतीच्या देखभाल दुरुस्तीसाठी प्रोत्साहन अनुदान राज्य स्तरावर राखीव (प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून शासनास सादर करण्यात येतील)

**रु. १५ कोटी**
नियमित (Regular) चालणाऱ्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी राज्य स्तरावर राखीव (प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदेकडून शासनास सादर करण्यात येतील)

**रु. १५ कोटी**
राज्यातील हंगामी (Seasonal) चालणाऱ्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी राज्य स्तरावर राखीव (प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदेकडून शासनास सादर करण्यात येतील)

**रु. ५ कोटी**
राज्यातील गुणवत्ता आधारीत प्रादेशिक योजनांसाठी राज्य स्तरावर राखीव (प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदेकडून शासनास सादर करण्यात येतील)

**रु. ४५ कोटी**
सर्व जिल्हा परिषदांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात देखभाल दुरुस्तीसाठी वितरीत होईल.

**रु. ५ कोटी**
एका गावच्या स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी राज्य स्तरावर राखीव (प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून शासनास सादर करण्यात येतील)

| |
|---|
| ठाणे जिल्हा (सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २२,२९,३७६) |
| या लोकसंख्येनुसार ठाणे जिल्ह्याला उपलब्ध होणारे देखभाल दुरुस्ती अनुदान रु.१,८२,११,७४८/- |
| ठाणे जिल्ह्यातील बोर्डी ही ग्रामपंचायत उदाहरणादाखल विचारात घेतल्यास |
| या ग्रामपंचायतीच्या स्वतंत्र न.पा.पु. योजनेचे मासिक वीज देयक अंदाजे रु. २५००/- |
| वार्षिक देयक रु. ३०,०००/- |
| प्रत्यक्ष भरलेल्या देयकांची रक्कम अंदाजे रु. ३०,०००/- त्याच्या ५० टक्के रु. १५,०००/- ही ग्रामपंचायतीची अनुज्ञेयता ठरेल. |
| ठाणे जिल्ह्यातील स्वतंत्र गावच्या न.पा.पु.योजनांच्या मागील आर्थिक वर्षातील वीजेच्या देयकांच्या प्रत्यक्ष अदायगीच्या ५० टक्के रक्कम रु.१८२.०० लक्ष इतकी येत असेल तर बोर्डी ग्रामपंचायतीस रु.१५,०००/- इतकी रक्कम प्राप्त होईल. |
| जर, वीजेच्या देयकांच्या प्रत्यक्ष अदायगीच्या ५० टक्के रक्कम रु.१८२.०० लक्ष पेक्षा जास्त असेल तर जिल्हा परिषदेने कमी पडणारी रक्कम आपल्या देखभाल दुरुस्ती निधीतून तितकी भर घालून बोर्डी ग्रामपंचायतीस रु.१५,०००/- इतकी रक्कम अदा करावी. |
| अन्यथा, जिल्हा परिषदेने उपलब्ध अनुदानाच्या प्रमाणात बोर्डी ग्रामपंचायतीस वीज देयकांची प्रतिपूर्ती करावी. |
| जर, वीजेच्या देयकांच्या प्रत्यक्ष अदायगीच्या ५० टक्के रक्कम रु.१८२.०० लक्षापेक्षा कमी येत असेल तर ग्रामपंचायतीला अनुज्ञेयतेनुसार रक्कम अदा करून शिल्लक राहिलेली रक्कम योजना नुतनीकरण निधीमध्ये जमा करण्यात येईल. |

राज्यस्तरावर ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता संस्थेची स्थापना करणेबाबत .. ..

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.११६/पापु-०७

## मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक २५ ऑगस्ट, २००९

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दि. २७ जून,२००० च्या शासन निर्णयान्वये मागणी आधारित समूह सहभागाचे धोरण स्विकारलेले आहे. या धोरणानुसार ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची मागणी, आखणी, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनीच करावयाची आहे. ही कार्यवाही ग्राम स्तरावर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येते. यासाठीच्या मार्गदर्शक सूचना दि.०३ सप्टेंबर,२००१ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. कार्यक्रमाच्या प्रभावी व पारदर्शी अंमलबजावणीसाठी त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा देखील करण्यात आलेल्या आहेत.

२. सन २००० पासून क्षेत्र सुधारणा व स्वजलधारा कार्यक्रमांतर्गत पाठपुरावा करण्यासाठी माहिती व संवाद क्षमता विकास कक्ष (CCDU) ची स्थापना करण्यांत आली आहे. सन २००३ पासून जलस्वराज्य प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी क्षेत्र सुधारणा व प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची (RSPMU) ची स्थापना करण्यात आली आहे. भारत निर्माण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सन २००७-०८ पासून राज्यस्तरावर भारत निर्माण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांचे कार्यालयात विभागीय भारत निर्माण कक्ष, जिल्हास्तरावर जिल्हा परिषदेमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व ग्रामस्तरावर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, तांत्रिक सेवा पुरवठादार व सहाय्यकारी संस्था यांचे माध्यमातून ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यात येते.

३. चालू आर्थिक वर्षापासून केंद्र शासनाने वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे रुपांतर "राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम" (National Rural Drinking Water Programme

रोटा/एच-१५१९[१२००-८-०९]-१

**NRDWP)** असे केले आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (व्याप्ती) NRDWP - (Coverage)

२) राष्ट्रीय ग्रापीण पेयजल कार्यक्रम (पाणी गुणवत्ता) NRDWP - Water Quality)

३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (स्त्रोत बळकटीकरण )NRDWP-(Sustainability Security)

४. आर्थिक वर्ष २००९-१० पासून राज्य शासनाचा ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम व केंद्र शासनाच्या **"राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची"** अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याचे नियोजन शासनाने केले आहे, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम वेगवेगळया नावांनी किंवा प्रकल्पाद्वारे राबविण्यात येत असला तरीही हे सर्व कार्यक्रम मागणी आधारित समूह सहभागाच्या सामायिक संकल्पनेद्वारे राबविण्यात येत आहेत. या सर्व कार्यक्रमांच्या अंमलबजावणीतील एकसूत्रता व मागणी आधारित समूह सहभागाच्या धोरणाची अंमलबजावणी करीत असताना आलेले अनुभव तसेच, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी काही महत्वाचे धोरणात्मक (policy reforms) व संरचनात्मक बदल (Policy and structural reforms) करणे शासनास आवश्यक दिसून आले. त्यानुसार, दि.०१ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयान्वये सुधारित धोरणात्मक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. याच अनुषंगाने संरचनात्मक बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता सध्या अस्तित्वात असलेला जलस्वराज्य (RSPMU), माहिती व संवाद क्षमता विकास कक्ष (CCDU), आपलं पाणी व भारत निर्माण कक्ष या सर्वांचे विलीनीकरण करुन महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने राज्याचा ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम व केंद्र शासनाचा राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राज्यामध्ये यशस्वीपणे राबविण्यासाठी, एकूणच ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणी व सनियंत्रणासाठी राज्यस्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता संस्थेची स्थापना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

३. या संस्थेचे नाव "महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था" असे राहील.

४. केंद्र व राज्य शासन पुरस्कृत तसेच बाह्यअर्थसहाय्यीत ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्प व कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी व सनियंत्रण हे या संस्थेचे प्रमुख कार्य असेल.

५. शासन निर्णय दिनांक ०१ ऑगस्ट, २००९ च्या अनुषंगाने राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचा वार्षिक कृती आराखडा तयार करणे, योजनांचे नियोजन व अंमलबजावणी मध्ये स्थानिक संस्थांना तांत्रिक व प्रशासकीय सहाय्य देणे, त्यांची क्षमता बांधणी करणे जनजागृती (IEC) करणे, तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या सनियंत्रणासाठी माहिती व व्यवस्थापन प्रणाली (MIS) विकसित करणे ही या संस्थेची जबाबदारी असेल.

६. महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था ही ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता कार्यक्रमाच्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनास व राज्य पाणी पुरवठा मिशन यास जबाबदार राहील. सर्व बाबींसाठी ती पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची संचालनालय (Directorate) म्हणून काम करील.

७. जोडपत्र-अ मध्ये दर्शविल्यानुसार ही संस्था राज्य, विभागीय व जिल्हा स्तरावर काम करेल. राज्यस्तरावर या संस्थेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी आयुक्त / संचालक हे असतील.

८. संचालकांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली १) मुख्य अभियंता (पाणी पुरवठा) २) राज्य समन्वयक (ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम) ३) वित्त व लेखाधिकारी ४) मानव संसाधन विकास/ व्यवस्थापन , क्षमता बांधणी अधिकारी / समन्वयक ५) माहिती, संवाद व शिक्षण समन्वयक ६) मुल्य मापन व सनियंत्रण अधिकारी ७) खरेदी शाखा प्रमुख ८) प्रशासन व तक्रार निवारण अधिकारी काम करतील

९. तसेच जोडपत्रामध्ये दर्शविल्यानुसार त्यांचा Support staff राहिल. विभागीय स्तरावर या संस्थेचे कार्यालय विभागीय आयुक्त कार्यालयाचा भाग म्हणून काम करेल. या संदर्भात सध्याचा विभागीय भारत निर्माण कक्षाचे रुपांतरण पाणी पुरवठा व स्वच्छता विभागीय कक्ष (Divisional support unit) म्हणून केले जाईल. जिल्हा पातळीवर या संस्थेचा विस्तार कक्ष म्हणून जिल्हा सहाय्य कक्ष (District support unit) स्थापन करण्यात येतील.

१०. विभागीय कक्ष व जिल्हा सहाय्य कक्ष यांची संरचना जोडपत्र-ब मध्ये दर्शविल्यानुसार असेल. मात्र, कामाची गरज लक्षात घेऊन वेळोवेळी आवश्यक ते बदल करण्याची मुभा संस्थेस असेल.

११. दिनांक २५ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा हे राज्य तांत्रिक अभिकरणे (State Technical Agencies) म्हणून काम करतील.